# प्रेस नोट

दि.२९/०७/२०१७ रोजी १२.०० वा वानवडी विभागातील वानवडी पोलीस स्टेशन,हडपसर पोलीस स्टेशन,कोंढवा पोलीस स्टेशन,मुंढवा पोलीस स्टेशन ,पुणे शहर कडील सर्व सार्वजनीक गणेशोत्सव साजरा करणाऱ्या गणेश मंडळांची/शांतता कमिटी/महिला दक्षता कमिटी यांची संयुक्त बैठक जांभुळकर गार्डन महात्मा फुले सांस्कृतीक भवन शिवरकर रोड वानवडी पुणे येथे वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर यांच्याकडुन आयोजीत करण्यात आली होती सदर बैठकी करीता १५० ते २०० मंडळांचे अध्यक्ष/पदाधिकारी शांतता कमिटी,महिला दक्षता कमिटी सदस्य उपस्थित होते.तसेच सदर बैठकीस मा.श्री.दिपक साकोरे पोलीस उप आयुक्त सो,परिमंडळ-४,श्री.सामीर शेख,सहा पोलीस आयुक्त सो,वानवडी विभाग,श्री.सयाजी.आ.गवारे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वानवडी पो.स्टे.,श्री.विष्णु पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पो.स्टे.,श्री.सतिश गोवेकर,वरिष्ठ पो.निरी.कोंढवा पो.स्टे.,श्री.ए.पी. पात्रुडकर ,वरिष्ठ पो.निरी.मुंढवा पो.स्टे.यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली सदर बैठकीचे सुत्र संचालन श्री.सयाजी.आ.गवारे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वानवडी पो.स्टे यांनी केले.सदर बैठकीस मा.श्री.दिपक साकोरे पोलीस उप आयुक्त सो,परिमंडळ-४ व श्री.सामीर शेख,सहा पोलीस आयुक्त सो,वानवडी विभाग यांनी सर्व मंडळांना सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या ध्वनीक्षेपकाच्या वापरा संबंधिचे नियम समजावुन सांगितले तसेच ध्वनीक्षेपनाचे वापरा करीता पोलीस स्टेशनकडून कायदेशीर पोलीस परवाना घ्यावा.सध्या पुणे शहरात गणेशोत्सवाचे परवाने हे ऑनलाईन देण्यात येणार असुन त्याकारीता सर्वांना पोलीस स्टेशन येथे जाण्याची गरज नाही.आपल्या मंडळाचे श्रीच्यामुर्तीच्या स्थापनेच्या,मडपाचे व विसर्जन मिरवणुकीच्या वेळी कर्णे व डॉलबी.डी.जे.स्पिकरचे उदा.दोन किंवा चार बेस यांना पुर्णता बंदी आहे.पारंपारीक वाद्याचा वापर करावा.गणेशोत्सवाचे काळात सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसवुण घ्यावेत.आपले मंडळ धर्मादायुक्त यांच्याकडे नोंदवुन घ्यावे.कोणी मुलींची व स्त्रीयांची छेडछाड करत असल्यास तात्काळ बंदोबस्तास असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन दयावे. कोणत्याही प्रकारचे प्रक्षोभक व चिथावणी देणारे तसेच जातीय तेढ निर्माण करतील असे देखावे करण्यात येऊ नये.वगैरे सुचना दिल्या तसेच श्री.सागर तुपे यांनी एक वार्ड एक गणपती अशी संकल्पना मांडली त्याबाबत पोलीस दलाकडुन योग्य ते सहकार्य मिळेक असे तसेच श्री.मसुद शेख यांनी सर्व मंडळांनी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे,सुरक्षा व्यवस्था,दर्शनासाठी व देखावा पाहण्यासाठी येणाऱ्या स्त्री पुरुष यांच्या वेगवेगळया रांगा लावाव्यात.प्रबोधनकाराक देखावे ठेवावेत,डी.जे./ डॉलबी यांचा वापर बंद करावा असे सुचवले.

तसेच मा.श्री.दिपक साकोरे पोलीस उप आयुक्त सो,परिमंडळ-४ व श्री.सामीर शेख,सहा पोलीस आयुक्त सो,गणेशोत्सव मोठया उत्साहात कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पारपडण्यास सर्व मंडळांकडुन सहकार्य मिळेल असे आवाहान केले त्यास सर्व मंडळांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.